क्र.कार्या.३अ/जमीन/आरआर/८५२/२१
जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर
दिनांक :- १० /११/२०१८

प्रति,
उपवनसंरक्षक,
कोल्हापूर वनविभाग,कोल्हापूर

**विषय :- मौजे-केर्ली-कोतोली-नांदगाव-नांदारी राज्य मार्ग क्र.१९१ (कि.मी. ००/०० ते कि.मी.२९/५०० भाग केर्ली फाटा-नांदारी जि.कोल्हापूर या रस्त्यांची सुधारणा करणे.**

**संदर्भ :-** उपविभागीय अधिकारी पन्हाळा यांचे कडील क्र.जमीन/कावि/४२७/२०२१ दिनांक ११/१०/२०२१ रोजीचा प्रस्ताव

उपरोक्त विषयास अनुसरून, कार्यकारी अभियंता,विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग,कोल्हापूर यांनी, केर्ली-कोतोली-नांदगाव-नांदारी राज्य मार्ग क्र.१९१ (कि.मी.००/०० ते कि.मी.२९/५००) भाग केर्ली फाटा-नांदारी जिल्हा कोल्हापूर या रस्त्याची सुधारणा करणेचे काम चालु असुन सदर रस्त्यामध्ये मौजे-पोर्ले तर्फे ठाणे,उत्रे ता.पन्हाळा व मौजे-नांदारी,माळापुडे,कातळेवाडी ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर या गावातील क्षेत्र २ हे.१५ आर वन जमीन बाधीत होत आहेत.त्यानुसार वन विभागाची बाधीत होणाऱ्या जमिनी बदल्यात पर्यायी जमिन म्हणून मौजे-मांजरे ता.शाहूवाडी येथील गट नं.४७ क्षेत्र ४२ हे.८५आर शिल्लक सरकारी मुलकीपड क्षेत्र ३७ हे.०९ आर पैकी २ हे.१५आर जमिन मिळावी. अशी मागणी केलेली आहे.

तरी कार्यकारी अभियंता,विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग,कोल्हापूर यांनी मागणी केले नुसार, मौजे-मांजरे ता.शाहूवाडी येथील गट नं.४७ एकुण क्षेत्र ४२ हे.८५आर पैकी शिल्लक सरकारी मुलकीपड क्षेत्र ३७ हे.०९ आर पैकी क्षेत्र २ हे.१५आर जमिन मौजे-पोर्ले तर्फे ठाणे,उत्रे ता.पन्हाळा व मौजे-नांदारी,माळापुडे,कातळेवाडी ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर येथील वन विभागाची रस्त्यासाठी बाधीत होणाऱ्या जमिनी बदल्यात पर्यायी जमिन पसंती असले बाबत आपला अभिप्राय तात्काळ सादर करणेत यावा.

( शंकरराव जाधव )
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**कोल्हापूर**

**प्रत माहितीसाठी :-** कार्यकारी अभियंता,विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग,कोल्हापूर